# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk२a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in

## सूचना

क्रमांक:२अ/एडीएम/एम.फार्मसी/२०१६/१६४०

दिनांक : 26 OCT 2016

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०१७ - १८ मधील एमबीए/एमएमएस आणि एम.फार्मसी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या प्रवेश परीक्षेबाबत...**

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टिईएम- २०१५ /१२१० /प्र.क्र.४३९/तांशि-४,दि. २४/०९/२०१५

२) शासन शुध्दीपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टिईएम २०१५/ १२१०/ प्र.क्र.४३९/तांशि- ४, दि. २८ /०९/२०१५

३) शासन अधिसुचना उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टिईएम- २०१५/सीआर५३६/ टिई- ४, दि. ११ /०३/२०१६

संदर्भाकिंत शासन निर्णय व अधिसुचनेनुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राज्यातील एमबीए/एमएमएस या पदव्युततर पदवी अभ्यासक्रमासाठी राज्याच्या सामायिक प्रवेश परीक्षा आणि अखिल भारतीय कोटयातील प्रवेशासाठी एआयसीटीई द्वारे घेण्यात येणारी CMAT ही एक प्रवेश परीक्षा निर्धारीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे All India Quota मध्ये प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांनी CMAT परीक्षेला बसणे इष्ट राहील.

तसेच एम फार्मसी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एआयसीटीई द्वारे घेण्यात येणारी राष्ट्रीय पातळीवरील GPAT परीक्षा निर्धारीत करण्यात आलेली आहे.त्यानुसार राज्यातील प्रथम वर्ष एम फार्मसी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०१७ - १८ मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणा-या सर्व उमेदवारांना राष्ट्रीय स्तरावरील GPAT परीक्षा देणे अनिवार्य आहे.

सदर दोन्ही परीक्षांसाठी रजिष्ट्रेशन दिनांक १०.१०.२०१६ पासून सुरू झालेले असून रजिष्ट्रेशन करण्यासाठीचा अंतिम दिनांक १०.१२.२०१६ असा आहे. एमबीए/एमएमएस साठीच्या CMAT या प्रवेश परीक्षेबाबतची अधिक माहिती http://www.aicte-cmat.in/candidate/login.aspx# आणि एम.फार्मसी.पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अनिवार्य असलेल्या GPAT प्रवेश परीक्षेबाबतची अधिक माहिती http://aicte-gpat.in/College/Index_New.aspx या वेबसाईटवर उपलब्ध आहे. एम.फार्मसी अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणा-या सर्व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक,तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

D:\OLD PC DATA\Admission २०१७- १८\GPAT compulsory notification.docx